RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXIII OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ .**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, ताबडतोब अंमलात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १५ (१) ची सुधारणा.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियमाच्या कलम १५ मधील पोट-कलम (४) मध्ये–

"भाडेपट्टा करून हस्तांतरित करता येईल" या मजकुराऐवजी "त्यांच्या नावावर मालकी हक्काने हस्तांतरित करता येईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम १५ मध्ये खाजगी मालकीच्या जागा संपादन केल्यानंतर त्याठिकाणी राहणाऱ्या झोपडपट्टीधारकास जागा देण्याबाबत संबंधित झोपडीधारकाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे अशी जमीन भाडेपट्टा करून हस्तांतरित करण्याची तरतूद आहे. या जमिनीवरील भोगवटाधारक सदरची जागा अधिग्रहण करण्याकरिता शासनाच्या नियमानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे शासकीय नियमानुसार रक्कम भरीत असतो. तरीही त्याला ती जागा भाडेपटट्याने देणे म्हणजे शासनाच्या नियमानुसार पैसे भरणाऱ्या झोपडीधारकावर अन्यायकारक आहे. म्हणून संबंधित भोगवटादारांना ती जागा भाडेपटट्याऐवजी मालकी हक्काने देणे आवश्यक झाले आहे. यास्तव महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १५ मध्ये तशी सुधारणा करण्याकरिता प्रस्तावित करण्यात आले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.